# मातृत्वफायदा कायदा, १९६१

## नमुना १

## (नियम ११ पहा)

(मातृत्व फायदा कायदा १९६१ चा गोषवारा व त्या खाली केलेले नियम)

१) कोणाही नेमणुक करणारांनी कारखान्यात जाणूनबुजून ती बाळंत झाल्यापासून किंवा गर्भपात झालेपासून सहा महीन्यांचे आत स्त्रीला नोकरीस ठेऊ नये व कोणाही स्त्रीने सदर काळात कोणतेही कारखान्यांत नोकरी करू नये.

२) कोणत्याही गर्भार बाईने त्याबाबत तिने विनंती केल्यास तिच्या अपेक्षित बाळंत होण्याच्या तारखेच्या आधी सहा आठवडे व तत्पुर्वीचा एक महीना किंवा सहा आठवड्यात जर तिने रजा घेतली नसल्यास तिला असे कोणतेही काम जे करण्यास कठीण आहे किंवा जास्तीत जास्त उभे रहावे लागेल किंवा ज्यामुळे तिच्या गर्भारपणांत आडकाठी येईल किंवा ज्यामुळे सामान्य वाढीस बाधा येईल किंवा ज्यामुळे गर्भपात होऊ शकेल किंवा तिच्या प्रकृतीवर प्रतिकुल परीणाम होईल असे काम तिचा मालक देवू शकत नाही.

३) (१) कायद्यास अनुसरून प्रत्येक महीला जीने मालकाच्या कंपनीमध्ये काम केले आहे व ज्याचेकडून तिच्या बाळंतपणाचे अंदाजीक तारखेच्या अगोदर एका वर्षात १६० दिवसापेक्षा (अशा एक वर्षाचे काळातील दिवसात तिला कमी केले असेल ते दिवस धरून) कमी नसलेली मातृत्वाचा फायदा मागत असेल त्यास पात्र राहील व तिच्या दररोजच्या सरासरीच्या पगाराच्या दराप्रमाणे मातृत्वाचे फायद्याची रक्कम तिच्या मालकास द्यावी लागेल किंवा (दररोज एक रूपया यात जी जास्त असेल ती तिचे बाळंतपणापासून, तो दिवस धरून सहा आठवड्यापेक्षा जास्त नसले गैरहजेरी बद्दल).

**असे असले तरी.**

१) मातृत्वाचा फायदा मिळण्याच्या काळात मिळविणारी स्त्री मेल्यास मातृत्वाचा फायदा मरणाचा दिवस धरून मरणाचे दिवसापर्यंत मिळेल.

२) ज्यावेळी स्त्री प्रसुत होऊन बालकास जन्म देईल बाळंतपणात किंवा तिच्या प्रसुतीच्या दिवसा पासून सहा आठवड्यात दोन्ही प्रसंगात मुल ठेवून मेल्यास तिचे बाळंतपणापासून सहा आठवड्याचा मातृत्वाचा फायदा देणेस मालक बांधील आहेत. परंतु सदर काळात जर मुल मेले तर मुलाच्या मरणाचा दिवस धरून त्याकाळ पुरणे बांधील आहेत.

तिच्या बाबत करण्यात आलेल्या अंदाजेतारखेपूर्वीचे दिवसांची फायद्याची रकम महाराष्ट्र मातृत्वाचे फायद्याचे नियम १९६१ (त्यास ह्यापुढे मातृत्व फायद्याचे ॰म असे संबोधिले आहे.) या खालील फॉर्म २ मध्ये नोंदणीकृत वैद्यकिय धं॰ गारा कडून तीगरफार आहे व सहा आठवड्यात मुलास जन्म देईल अ॰ ..खला ज्या तारखेस ती हजर करील तेव्हा मालकाची अगाऊ देणेची आहे व पु॰ ॰ कालावधीची रक्कम नोंदणीकृत वैद्यकिय धंदा करणाराकडून सदर फॉर्म म॰ न दाखला हजर वेळेवर किंवा नोंदणीकृत नर्स कडून मातृत्व फायद्याचे नियमा॰ च फॉर्म नं. ३ प्रमाणे दाखला हजर केलेवर अगर कोणतेही कायद्याच्या तरतुदीनु तिने बालकास जन्म दिला आहे असा बाबतच्या त्यावेळी ॰रितत्वात असलेले ज॰ त्यू नोंदीची सही शिक्क्याची नक्कल हजर वेळेवर ॰ी देणेची आहे

५) १) एखादी स्त्री कारखान्यात नोकरीस लागली व मातृत्वाचे फायद्यास कायद्याच्या तरतुदीप्रमाणे पात्र झाली तर मातृत्वापणाचे फायद्याचे नियमात दिलेला फॉर्म १ प्रमाणे तिचे मालकास नोटीस देऊन मातृत्वाचे फायदे व इतर रकमाची नोंद करून तो नीस अगर ती ज्या माणसाची नेमणुक करील त्यास द्यावी व ती कोणतेही कारखान्यात मातृत्वाचा फायदा मिळेल त्या काळात नोकरी करणार नाही.

२) जी स्त्री गरोदर आहे तिचे बाबतीत सदर नोटीस मध्ये कोणते तारखेपासून कामावर गैरहजर नोटीसमध्ये कोणते तारखेपासून कामावर गैरहजर राहील ती तारीख लिहावी. ती तारीख तिचेच संभावीत बाळंतपणाची तारखेपासून सहा आठवडे अगोदरची असू नये.

३) कोणाही स्त्रीने ती केव्हा गरोदर राहील्या बाबत नोटीस दिली नसेल तीने बाळंतझालेवर शक्या होईल तितक्या लवकर नोटीस देणेची आहे.

४) नोटीस मिळाले वर, तिचे बाळंतपणानंतर सहा आठवडे कालावधी संपेपर्यंत कामावर गैरहजर राहणेस मालकाची परवानगी देणेची आहे.

६) कायद्याप्रमाणे ज्या स्त्रीस बाळंतपणाचा फायद्याचा हक्क आहे तीस मालकाकडून वैद्यकिय बोनस २७ (ता. ११.१.१९८१ पासून रक्कम २५० पर्यंत वाढविली आहे.) मिळण्याचा हक्क आहे. जर मालकांनी अकालीक बाळंतपण व पोस्ट ना काळजीची सोय केली नसेल तर वैद्यकिय बोनस हा मातृत्वाच्या फायद्याच्या दुसऱ्या हप्त्याबरोबर घ्यावयाची आहे.

२) गर्भपाताच्या प्रसंगी मातृत्व फायद्याचे फॉर्म नं. २ प्रमाणे जर स्त्रीने अधिकृत नोंदणी झालेले वैद्यकिय व्यवसाय करणारे स्त्री हीचे कडून दाखला हजर केल्यास गर्भपात झाल्या दिवसापासून सहा आठवडे मातृत्व फायद्याच्या दरा प्रमाणे पगारी रजेस पात्र आहे. फॉर्म नं. २ किंवा फॉर्म नं. ३ जशी केस असेल त्याप्रमाणे दाखला हजरर केलेपासून ४८ तासात दिला जाईल.

३) मातृत्व फायद्याचे नियमात असलेला फॉर्म नं. २ प्रमाणे अधिकृत नोंदणी झालेल्या वैद्यकिय धंदा करणाराकडून गर्भारणा पासून येणारे आजारपण अकाली मुलास जन्म किंवा गर्भपात यांचेपासून आजारी असल्याबदलचा दाखला हजर केले तर बाळंतपण किंवा गर्भपात या कारणांस्तव जशी केस असेल त्याप्रमाणे दिल्या गेलेले गैरहजेरी पेक्षा एक महीन्याची रजा बाळंतपणाच्या फायद्याचे दराप्रमाणे मिळण्यास पात्र आहे. रजेच्या काळाचा पगार अशा आजारीपणाचा पुरावा हजर केलेपासून ४८ तासांत दिला जाईल.

७) मुलास जन्म दिलेल्या प्रत्येक स्त्रीस ती कामावर हजर झाल्यावर तिला मधली विश्रांती मंजुर केलेपेक्षा रोजचे कामात १५ मिनिटांच्या दोन सुट्या मुल १५ महिन्याचे होईपर्यंत मुलाची सुश्रुशा करणेसाठी द्याव्यात.

कामावर असताना तीने आपल्या लेकरास कामगारांच्या मुलांचे संगोपन करण्याऱ्यांचे ठिकाणी ठेवले असेल त्याठीकाणी पोचण्यास व नोकरीच्या ठिकाणी परत येण्यास अशा विरामांचा कालावधी पांच मिनिटापेक्षा कमी व जास्तीत जास्त पंधरा मिनीटं देण्याची सवलत असावी व अशा करणासाठी स्त्री लागणारा कालावधी योग्य आहे की नाही याचा वाद उत्पन्न झाल्यास त्याबाबत सक्षम अधिकाऱ्यांनी अशा प्रत्येक विरामाची वेळ वाढवावी.